ePaper
**मला सत्यजीत तांबेंचा फोन आला त्यांना समक्ष भेटणार : अजित पवार**



| वर्ष - 6 | अंक - 290 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- वाकडला त्रास वेकायदा झोपड्पट्टीचा!
- चिंचवड पोटनिवडणूक बिनविरोधच्या वाटेवर ?
- महाविकास आघाडीत आनंदाचे डोही, आनंद तरंग...

www.mahaenews.com | रविवार, दि. 5 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राष्ट्रवादीत त्सुनामीपूर्वीची शांतता!

## » आयात उमेदवार नकोच ; अन्यथा बंडखोरीची 'मशाल' पेटणार!


**| पिंपरी | महाईन्यूज | विशेष प्रतिनिधी |**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीवरून पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादीत वादळापूर्वीची नव्हे, तर त्सुनामीपूर्वीची शांतता आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारीवर राष्ट्रवादीने 'घड्याळ' चिन्हासह दावा केला. मात्र, संबंधित उमेदवार आयात करण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे इच्छुकांमध्ये प्रचंड नाराजी असून, पक्षविरोधी भूमिका घेण्याचा निर्धात नाराज गटाने घेतला आहे.**

चिंचवडची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी. याकरिता भारतीय जनता पार्टीकडून प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळेच दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीकडून राहुल कलाटे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. तत्पूर्वी, राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी ही निवडणूक राष्ट्रवादीच्या 'घड्याळ' चिन्हावर लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र, उमेदवार आयात करु नये, अशी स्थानिक पदाधिकाऱ्यांची आग्रही मागणी आहे.

पक्षश्रेष्ठींनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादीतील इच्छुकांपैकी कोणालाही उमेदवारी द्यावी, या मागणीने जोर धरला आहे. आयात उमदेवार देण्यास राष्ट्रवादीतून जोरदार विरोध सुरू झाला आहे. इच्छुकांनी आणि पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी तसे पक्षाच्या वरिष्ठांना स्पष्टपणे सांगितले आहे. मात्र वरिष्ठांनी उमेदवार आयात करण्याचा निर्णय घेतल्याचे खात्रीशीर वृत्त आहे. त्यामुळे चिंचवड मतदारसंघात राष्ट्रवादीत अंतर्गत कलह उफाळून येणार असून, बंडाळी होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

२०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीला चिंचवड मतदारसंघात उमेदवार सापडला नव्हता. त्यामुळे पक्षावर नामुष्की ओढावली होती. शिवसेनेच्या बंडखोर उमेदवाराला पाठिंबा देण्याची वेळ राष्ट्रवादीवर आली होती. भाजपाविरोधात सर्वपक्षीय एकच उमेदवार देऊनही चिंचवड मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला नाही. आता पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीने चिंचवड पोटनिवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. पोटनिवडणूक लढविण्यासाठी पक्षाकडे अनेकजण तयार असतानाही उमेदवार आयात केल्यास राष्ट्रवादीतील अनेकजण वेगळा विचार करण्याच्या मानसिकतेत आहेत.



### नाना काटेंची तयारी पूर्ण पण...

» वास्तविक, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी सुरू केली आहे. गेल्या काही दिवसांपासून काटे समर्थक मतदार संघात भेटी-गाठी आणि नियोजन करीत आहेत. विशेष म्हणजे, सुमारे २५० तरुणांची टीम मतदार संघात निवडणूक व्यवस्थापन आणि कामकाज पाहत आहे. काटे यांनी भाजपाबहूल प्रभागात स्वत: आणि पत्नी शीतल काटे यांना निवडून आणण्याचा करिष्मा प्रचंड मोदी लाटेतसुद्धा केला होता. पिंपळे सौदागर, रहाटणी, सांगवी, काळेवाडी, थेरगाव, वाल्हेकरवाडी आदी भागात काटे यांना मानणारा वर्ग तुलनेत जास्त आहे. राष्ट्रवादीची संघटनात्मक ताकद भाजपाच्या तोडीची आहे. अशा परिस्थितीत नाना काटे यांना उमेदवारी निश्चित करावी, अशी मागणी काटे समर्थकांनी केली आहे. कोणत्याही परिस्थितीत आयात उमेदवाराची साथ देणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून बोलून दाखवला जात आहे.

# पिंपरी-चिंचवड पोलिसांची धडक कारवाई, 15 दिवसात 211 आरोपींना अटक

## » पोलीस आयुक्तालया अंतर्गत असलेले सर्व पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, यांची कारवाई

पिंपरी चिंचवड | | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 19 जानेवारी ते 3 फेब्रुवारी या 15 दिवसांच्या कालावधीत 211 आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून 253 घातक शस्त्रे जप्त केली आहेत. पोलिसांनी राबवलेल्या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांचे मात्र धाबे दणाणले आहेत.**

या मोहितेम पोलीस आयुक्तालया अंतर्गत असलेले सर्व पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, यांनी ही कारवाई केली आहे. यामध्ये पोलिसांनी 36 गुन्हे हे केवळ बेकायदेशीररित्या पिस्टल बाळगणाऱ्या विरोधात दाखल केले असून इतर घातक शस्त्रे बाळगल्याप्रकरणी 150 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या मोहिमेत पोलिसांनी 211 आरोपींना अटक केले आहे. त्यांच्याकडून 48 पिस्टल, 205 घात शस्त्रे असे एकूण 253 शस्त्रे जप्त केली आहेत.

हि कारवाई करत असताना तपासी पथकांनाही प्रोत्साहन मिळावे म्हणून कामगिरीनुसार त्यांना क्रमांक देण्यात आले आहेत. यात प्रथम क्रमांक दरोडा विरोधी पथक, द्वितीय क्रमांक गुंडा विरोधी पथक, तृतीय क्रमांक युनीट-4 यांनी मिळवला आहे. तसेच, पोलीस ठाणे स्तरावर महाळुंगे, शिरगाव, पिंपरी या पोलीस ठाणे यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली आहे.या मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या घटक प्रमुखांना व अंमलदारांना पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे हे प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करणार आहेत. तसेच यापुढेही ही कारवाई अशीच सुरु राहणार आहे, असेही पोलीस आयुक्त चौबे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



## शॉर्ट न्यूज

### एक लाख विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेऊन नोंदवला विक्रम

पुणे : आर्ट ऑफ लिव्हिंग फाऊंडेशनसह शहरातील शैक्षणिक संस्थांतर्फे झालेल्या 'एज्युयूथ मीट' या कार्यक्रमात 'व्यसन करणार नाही आणि करू देणारही नाही...' अशी शपथ एक लाख विद्यार्थ्यांनी घेतली. या शपथेची लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली.

अध्यात्मिक गुरू श्री श्री रवीशंकर यांच्या उपस्थित झालेल्या या कार्यक्रमाला खासदार विनय सहस्त्रबुद्धे, नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, राजेश पांडे, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, आर्ट ऑफ लिव्हिंगचे राजेश शास्तारे, एज्युयूथ मीटचे प्रमुख हिमांशू नगरकर, शेखर मुंदडा आदी उपस्थित होते.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणितणावमुक्त शिक्षणासंदर्भात रविशंकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वर्षानुवर्षे आपण आंधळेपणाने शिक्षण घेत आहोत. व्हारिक आयुष्यात काहीच उपयोग होत नसलेल्या अभ्यासक्रमातील प्रचंड माहितीच्या ओझ्याने आपण दबले गेले आहोत.

# वाकडला त्रास बेकायदा झोपडपट्टीचा!

## » पीएमआरडीए'चा एक मोकळा भूखंड गुन्हेगारीचे आगार

**।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आयटी कंपन्यांमधील लोकांचा वास्तव्यासाठी सर्वाधिक पसंती परिसर वाकड आहे. गेल्या काही वर्षात उच्चभ्रू सोसायट्यांनी परिसर खुलून गेला आहे. मात्र, येथील 'पीएमआरडीए'चा एक मोकळा भूखंड गुन्हेगारीचे आगार बनला आहे. यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडत असल्याने परिसराची डोकेदुखी ठरत आहे. याकडे गांभीर्याने पाहत हा भूखंड मोकळा करून रहिवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.**

क्रमांक २१०, २०८, २०९ मध्ये सुमारे ४२ गुंठ्याचा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) हा भूखंड आहे. तो पिंपरी-चिंचवड महापालिका (विशेष नियोजन प्राधिकरण) यांच्या अधिकार क्षेत्रात येतो. या जागेत बेकायदेशीर ऐंशीहून अधिक झोपड्या उभारल्या गेल्या आहेत. त्यामुळे नाल्यात-उघड्यावर कचरा टाकणे, उघड्यावर शौचास बसणे, डुकरांचा सुळसुळाट, अस्वच्छता, दुर्गंधी या सर्व किळसवाण्या प्रकाराला आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना दररोज सामोरे जावे लागते. येथे वीजेचा अभाव असल्याने अंधारात अनेक काळे धंदे देखील चालतात. उघड्यावर मद्यपानास बसणाऱ्या टोळ्या, यातून होणारी आरडाओरडा, भांडणे, हुल्लडबाजी नियमित सुरू असते.

गांजा, गावठी दारू विक्री याबरोबरच गुन्हेगारी व्यवहार, बेकायदेशीर कृत्ये व गुन्हेगारांचे हे आश्रयस्थान बनले आहे. येथून अनेकदा कित्येक लाखांचा गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. हा परिसर गांजा विक्री करणाऱ्यांसाठी एक सोईस्कर आणि सुरक्षित अड्डा बनला आहे. गुन्हेगारांचा आणि अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचा वावर वाढलेला आहे.



त्यामुळे परिसराची सुरक्षितता ठेवण्यासाठी अशा बेकायदेशीर झोपड्या तातडीने हटवाव्यात अशी मागणी सोसायटीच्या रहिवाशांनी केली आहे. याबाबत सातत्याने अनेक सोसायट्यांनी पीएमआरडीए, महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला, पत्रव्यवहार केला, बैठका झाल्या. मात्र आजवर केवळ आश्वासनच मिळाले, असा रहिवाशांचा आरोप आहे.

### गुन्हेगारांचे हे आश्रयस्थान बनले

» या जागेत बेकायदेशीर ऐंशीहून अधिक झोपड्या उभारल्या गेल्या आहेत. त्यामुळे नाल्यात-उघड्यावर कचरा टाकणे, उघड्यावर शौचास बसणे, डुकरांचा सुळसुळाट, अस्वच्छता, दुर्गंधी या सर्व किळसवाण्या प्रकाराला आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना दररोज सामोरे जावे लागते. येथे वीजेचा अभाव असल्याने अंधारात अनेक काळे धंदे देखील चालतात. उघड्यावर मद्यपानास बसणाऱ्या टोळ्या, यातून होणारी आरडाओरडा, भांडणे, हुल्लडबाजी नियमित सुरू असते. गांजा, गावठी दारू विक्री याबरोबरच गुन्हेगारी व्यवहार, बेकायदेशीर कृत्ये व गुन्हेगारांचे हे आश्रयस्थान बनले आहे. येथून अनेकदा कित्येक लाखांचा गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. हा परिसर गांजा विक्री करणाऱ्यांसाठी एक सोईस्कर आणि सुरक्षित अड्डा बनला आहे. गुन्हेगारांचा आणि अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचा वावर वाढलेला आहे.

# पुण्यात ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन!

**।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**ब्रिटिशकालीन पुण्यातील पहिला तुरुंग, ब्रिटिशकालीन न्यायालय, आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांनी अंतिम श्वास घेतलेले ठिकाण यांसह शस्त्रांचे भव्य प्रदर्शन पाहण्याची संधी पुणेकरांना मिळाली आहे. निमित्त आहे, आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक हुतात्मा स्मारक इतिहास व संशोधन विभागातर्फे आयोजित प्रदर्शनाचे.**

**आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या १९१व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून स्मारकाचा इतिहास व संशोधन विभागाच्या वतीने मामलेदार कचेरीतील स्मारकात ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन आयोजिले आहे. त्यासमवेत नाईक यांच्या संदर्भातील समकालीन कागदपत्रांचेही प्रदर्शन आयोजित असून ते विनामूल्य आहे. याबाबत शाळांनी संपर्क केल्यास व्यवस्थापनात मदत होईल, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

**प्रदर्शनाविषयी...**

**- कुठे : आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक हुतात्मा स्मारक, मामलेदार कचेरी - कधी : ५ फेब्रुवारीपर्यंत**



# नाराजीने भाजप, काँग्रेसची डोकेदुखी वाढली

## » भाजपने कसबा मतदारसंघातून भाजपने हेमंत रासने यांना उमेदवारी

**।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भाजपने कसबा मतदारसंघातून भाजपने हेमंत रासने यांना उमेदवारी देऊन शैलेश टिळक यांची नाराजी ओढवून घेतली आहे. ब्राह्मण समाज भाजपवर नाराज होण्याची शक्यता त्यांनी बोलून दाखवली आहे. त्यामुळे क्रीडामंत्री गिरीश महाजन यांनी घरी जाऊन टिळक यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

तर दुसरीकडे काँग्रेसचे बाळासाहेब दाभेकर यांनी निष्ठावंताला डावलून बाहेरच्याला उमेदवारी दिल्यास बंडखोरी करणार असे आव्हान पक्षाला दिल्याने काँग्रेसने उमेदवार जाहीर करण्याचे टाळले आहे. त्यामुळे आता कसबा मतदारसंघात पक्षांतर्गत भूमिकेमुळे भाजप आणि काँग्रेसची डोकेदुखी वाढली आहे.





आमदार मुक्ता टिळक यांचे निधन झाल्याने कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत उमेदवारीसाठी हेमंत रासने आणि शैलेश टिळक यांच्यामध्ये स्पर्धा होती. आमदार टिळक यांचे निधन झाल्याने संकेतानुसार उमेदवारी मिळावी यासाठी शैलेश टिळक यांनी प्रयत्न केले होते. पण पक्षाने रासने यांना उमेदवारी दिल्याने टिळक नाराज झाले आहेत. काँग्रेसमध्ये रवींद्र धंगेकर यांचे नाव निश्चीत झाल्याचे सांगण्यात येत असल्याने त्यांच्या कार्यालयासमोर फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला. पण काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांमध्ये धंगेकर यांच्या उमेदवारीवरून नाराजी आहे. त्यास काही स्थानिक नेत्यांनी देखील फूस लावल्याने बंडखोरीचा फटका बसू शकतो यामुळे आज उमेदवारी जाहीर झाला नाही. रविवारी किंवा सोमवारी उमेदवारी जाहीर होईल असे सांगितले जात आहे. दरम्यान, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शहर पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन ही निवडणूक कशी लढवायची यावर मंथन केले.

तर अपक्ष अर्ज भरणार

काँग्रेसमधील एकनिष्ठ कार्यकर्त्यांना डावलून बाहेरून पक्षात आलेल्या व्यक्तीला उमेदवारी दिली जात असले तर मी अपक्ष अर्ज भरणार आहे. काँग्रेसमधील अनेक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांची भूमिका जुन्या कार्यकर्त्यांना संधी दिली पाहिजे अशी आहे. पण ही संधी नाकारली तर मला बंडखोरी करावी लागेल. अपक्ष अर्ज भरून खांद्यावर भगवा झेंडा घेऊन प्रचार करणार, असे काँग्रेसचे इच्छुक उमेदवार बाळासाहेब दाभेकर यांनी सांगितले.

### पक्षाशी एकनिष्ठ पण...

**» "आमदार मुक्ता टिळक यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी संधी द्यावी अशी मागणी पक्षाकडे केली होती. आमदारांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या घरातील व्यक्तीला उमेदवारी दिली जाते. पण पक्षाने वेगळा विचार केला. पुण्यात ब्राह्मण समाजाला प्रतिनिधित्व नसल्याने हा समाज नाराज होण्याची शक्यता आहे, त्यामुळे या समाजाची समजूत काढणे नेत्यांचीच जबाबदारी आहे. मुक्ता टिळक यांच्यासोबत २५ वर्ष काम करणाऱ्यांनी जाण ठेवून या निवडणुकीत कुटुंबीयांना संधी दिली असती तर ती मुक्ताताई यांना खरी श्रद्धांजली ठरली असती. आम्ही पक्षाशी एकनिष्ठ आहोत आणि राहणार, असे टिळक यांनी सांगितले.**

# चिंचवड पोटनिवडणूक बिनविरोधच्या वाटेवर ?

## » भाजपकडून लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी जाहीर...

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होणार आहे. ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, असा भाजपाचा प्रयत्न आहे. मात्र, महाविकास आघाडीदेखील ही निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे. दरम्यान, या पोटनिवडणुकीसाठी भाजपाकडून आज शनिवारी उमेवार जाहीर करण्यात आले आहेत.**

### महाविकासकडून शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांच्या नावावर शिक्कामोर्तब?...





भाजपाने चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना उमेदवारी दिली आहे. तर कसबापेठ येथील पोटनिवडणुकीसाठी पुणे महापालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

### राजकीय तर्क-वितर्कांना उधान

» महाविकास आघाडीकडून शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे आणि राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांच्या नावांचा विचार केला जात आहे. त्यात राहुल कलाटे यांचे नाव आघाडीवर आहे. आज चार वाजेपर्यंत अधिकृत उमेदवारी जाहीर होईल अशी शक्यता आहे.

» भाजपने अश्विनी जगताप यांच्या रूपाने महिला उमेदवार मैदानात उतरविल्यामुळे महाविकास आघाडी ऐनवेळी माघार घेणार घेऊन निवडणूक बिनविरोध करणार? की, अपक्ष महिला उमेदवाराला मदतीचा हात पुढे करणार? याबाबत राजकीय तर्क-वितर्कांना उधान आले आहे.


---

# उमेदवार जाहीर केले असले, तरीही बिनविरोधसाठी भाजपचे प्रयत्न सुरुच

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात निधन झालेल्या आमदारांच्या कुटुंबातील उमेदवार असेल, तर संबंधित ठिकाणी निवडणूक बिनविरोध करण्याची प्रथा आहे. काही ठिकाणी अपवाद झाला असेल, असे म्हणत राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी विरोधकांना चिंचवडची निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केलं आहे.**







आमदारांच्या निधनामुळे होत असलेल्या कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपने आपले उमेदवार आज जाहीर केले. तरीही त्यानंतर या दोन्ही निवडणुका बिनविरोध करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरुच आहेत. त्यांचे रणनितीकार व ट्रबल शूटर असलेले मंत्री गिरीश महाजन यांनीच पिंपरी-चिंचवडमध्ये आज याला दुजोरा दिला.

चिंचवडमधून दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना पक्षाची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यानंतर आज एका राज्य कार्यशाळेसाठी महाजन पुण्यात बाणेर येथे आले होते. त्यावेळी महाजनांनी जगताप कुटुंबांची पिंपळे गुरव येथील निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना विरोधकांना चिंचवड निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केलं.

गिरीश महाजन म्हणाले, "चिंचवड हा भाजपचा बालेकिल्ला असून तेथे पक्षाचा विजय शंभर टक्के निश्चीत आहे. निधन झालेल्या आमदारांच्या कुटुंबातील उमेदवार असेल, तर ती निवडणूक बिनविरोध करण्याची प्रथा आहे. ती विरोधकांनी पाळावी."यावर भाजपनेही यापूर्वी प्रथा मोडल्याची आठवण त्यांना करून देण्यात आली. त्यावेळी सारवासारव करीत महाजन म्हणाले, "खरं तर अशा वेळी निवडणूक बिनविरोध करायला हवी. तशी परंपरा आहे. काही ठिकाणी अपवाद असू शकतो. तसेच उमेदवार दिले असले, तरी ही निवडणूक बिनविरोध करण्याचे आमचे प्रयत्न सुरुच आहेत," अशी कबुली त्यांनी दिली.

यानंतर त्यांनी जगताप कुटुंबाबाबत माहिती दिली. महाजन म्हणाले, "जगताप कुटुंबात कसलाच वाद, नाराजी आणि उमेदवारीवरून संघर्ष नाही. लक्ष्मणभाऊ असतानाची परिस्थिती होती आजही तशीच आहे. हा वाद व संघर्ष मीडियानेच उभा केला आहे. उलट या निवडणुकीची धुरा सोपविण्यात आल्याने शंकर जगताप यांची जबाबदारी आता वाढली आहे",

असेही ते यावेळी म्हणाले. अश्विनी जगताप यांची उमेदवारी सकाळी जाहीर होताच दुपारी त्या प्रथमच मिडियाला सामोरे गेल्या. तत्पूर्वी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजनयांनी त्यांची पिंपळे गुरव येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

त्यानंतर बोलताना जगताप कुटुंबात वाद आहे ही विरोधकांनी उठवलेली वावटळ (अफवा) असल्याचे त्यांनी सांगितले. गेली तीस वर्षे मी फ्रंटला नसले, तरी पडद्यामागून त्यांच्या (आ. जगताप) पाठी मी काम करीत होते. पिंपळे गुरव, सांगवी, नवी सांगवी, रहाटणी हा भाग मी पिंजून काढला होता. त्यामुळे मला चांगला अनुभव आहे. कार्यकर्ते व नगरसेवक बरोबर असल्याने कशा प्रकारे निवडणुकीला सामोरे जायचे याचा अनुभव आहे, असे सांगत त्यांनी निवडणूक तयारीचे रणशिंग फुंकले.

### » गिरीश महाजनांनी विरोधकांना केलं आवाहन, 'जगताप कुटुंबात वाद ही विरोधकांनी उठवलेली वावटळ

### शंकर जगताप हे मला मुलासारखे''

» चिंचवडचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे तेथे लागलेल्या पोटनिवडणुकीत भाजपचा उमेदवार निश्चीत होण्यास मोठा वेळ लागला. त्यातून जगताप कुटंबात वाद असल्याने तो जाहीर करण्यास विलंब झाल्याची चर्चा रंगली होती. मात्र, ती फक्त अफवा असल्याचे खुद्द स्व. आ. जगतापांच्या पत्नी आणि चिंचवडच्या भाजप (BJP) उमेदवार अश्विनी जगताप यांनी आज स्पष्ट केले.अश्विनी जगताप यांची उमेदवारी सकाळी जाहीर होताच दुपारी त्या प्रथमच मिडियाला सामोरे गेल्या. तत्पूर्वी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन (GIRISH MAHAJAN) यांनी त्यांची पिंपळे गुरव येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर बोलताना जगताप कुटुंबात वाद आहे ही विरोधकांनी उठवलेली वावटळ (अफवा) असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच माझे दीर शंकरशेठ जगताप हे मला मुलासारखे आहेत, असे त्या म्हणाल्या.

### गेली तीस वर्षे साहेब फ्रंटला, तर मी त्यांच्यापाठी होते

» साहेबांच्या (स्व. आ. जगताप) विचाराचा वारसा पुढे नेण्याचा आटोकाट प्रयत्न करणार आहे. तसेच पिंपरी-चिंचवडला (PIMPRI-CHINCHWAD) मेट्रो सिटी बनविण्याचे त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्नही साकार करण्यासाठी अशीच झटणार आहे, असे अश्विनी जगताप यांनी उमेदवारी सांगितले. पक्षाचा अजेंडा पुढे नेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेली तीस वर्षे मी फ्रंटला नसले, तरी पडद्यामागून त्यांच्या (आ. जगताप) पाठी मी काम करीत होते. पिंपळे गुरव, सांगवी, नवी सांगवी, रहाटणी हा भाग मी पिंजून काढला होता. त्यामुळे मला चांगला अनुभव आहे. कार्यकर्ते व नगरसेवक बरोबर असल्याने कशा प्रकारे निवडणुकीला सामोरे जायचे याचा अनुभव आहे, असे सांगत त्यांनी निवडणूक तयारीचे रणशिंग फुंकले.

# महाविकास आघाडीत आनंदाचे डोही, आनंद तरंग...



भाष्य

नितीन सावंत
91 9892514124

**विधानपरिषद निवडणुकांच्या निकालावरून महाविकास आघाडीत आनंदाचे वातावरण आहे. रायगड शिक्षक वगळता नागपूर शिक्षक,औरंगाबाद शिक्षक आणि अमरावती पदवीधर महाविकास आघाडीच्या ताब्यात आले आहेत.नाशिक पदवीधर मतदार संघ अपेक्षेप्रमाणे तांबे आणि थोरात कुटुंबियांच्या ताब्यात राहिला आहे.या निवडणूक निकालानंतर महाविकास आघाडी अधिक मजबूत असल्याचा दावा आता या आघाडीचे नेते करतील पण अजून दिल्ली बहोत दूर हैं,असे वातावरण आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्ष किती काळ एकत्र राहणार यावर पुढील यश अवलंबून आहे.या निवडणुकीत मात्र आघाडी नेटाने लढली, याचा प्रत्यय अमरावती च्या विजयावरून दिसून आले.**



रायगड शिक्षक मतदार संघाची जागा भाजपने शेतकरी कामगार पक्षाकडून खेचून आणली.शेतकरी कामगार पक्षाचे विद्यमान आमदार बाळाराम पाटील यांचा दारुण पराभव झाला.येथे भाजपचे ज्ञानेश्वर म्हात्रे विजयी झाले.म्हात्रे यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिंदे सेनेमधून भाजप मध्ये प्रवेश केला.म्हात्रे यांना भाजपच्या तिकिटावर विजयाची खात्री होती.त्यामुळेच त्यांनी भाजप मध्ये प्रवेश केला.शिंदे सेनेला ही जागा भाजप सोडण्यास तयार होती पण शिंदे सेनेतून विजयाची खात्री नसल्याने म्हात्रे यांनी भाजप मध्ये प्रवेश केला. शेकापचे सर्वेसर्वा जयंत भाई पाटील यांची अरेरावी या निवडणुकीत पक्षाला भारी पडली,असे शिक्षक मतदार सांगतात.

औरंगाबाद शिक्षक मतदार संघात विक्रम काळे यांचा विजय हा महाविकास आघाडीमुळे सुकर झाला,असे येथील शिक्षकांचे म्हणणे आहे.विक्रम काळे यांच्या डोक्यात फारच हवा गेली होती. शिक्षकांना वागणूक ही व्यवस्थित देत नसत.त्यांच्या विरोधात तक्रारी ही पक्ष श्रेष्ठींना गेल्या होत्या.पण ऐनवेळी अजित दादांनी त्यांच्या पारड्यात वजन टाकले. शिक्षक विधानपरिषदेतील कामगिरी बघत नाहीत.आपला प्रतिनिधी आपल्याशी कसा वागतो याकडे त्यांचे लक्ष असते.भाजपने ही आपला उमेदवार काँग्रेस कडून आयात केला होता.काँग्रेसच्या नेत्या रजनीताई पाटील यांचे समर्थक असलेले किरण पाटील यांच्या दोन चार शिक्षण संस्था आहेत.निवडणुकीच्या सात आठ महिने अगोदर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात नागपूर सुधार न्यास चा प्रश्न उपस्थित करणारे ना.गो. गाणार यांनाही यावेळी नागपूरच्या शिक्षकांनी घरी पाठवले आहे.विदर्भ शिक्षक संघाचे उमेदवार सुधाकर अडबाले या नवख्या उमेदवाराला महा विकास आघाडीने पुरस्कृत केले होते. त्यांनी ना.गो. ना धूळ चारली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे एकेकाळी समर्थक असलेले डॉ.रणजित पाटील यांनाही पराभवाची नामुष्की पत्करावी लागली.मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी रणजित पाटील यांना गृह आणि नगरविकास ही दोन्ही महत्वाची खाती देऊन विश्वास टाकला होता.पण सत्ता गेल्यानंतर त्यांनी फडणवीस यांना सोडून नितीन गडकरींशी संधान बांधले होते.त्यामुळे फडणवीस यांनीही अमरावती कडे फारसे लक्ष दिले नाही.काँग्रेसच्या धीरज लिंगाडे या नवख्या उमेदवाराने अटीतटीच्या लढतीत रणजित पाटील यांचा पराभव केला.आंतरराष्ट्रीय भाचे अशी ज्याची ख्याती आहे ते सत्यजित तांबे अपेक्षेप्रमाणे विजयी झाले आहेत.काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी माध्यमां समोर मौन बाळगून आपले भाचे सत्यजित यांना निवडून आणले.डॉ.सुधीर तांबे अतिशय सोज्वळ आणि सालस अशी त्यांची प्रतिमा आहे.डॉ. तांबे यांना विधानपरिषद सभागृहात किंवा सभागृहाबाहेर चिडलेले कुणी पाहिले असेल अशी एकही व्यक्ती तुम्हाला सापडणार नाही.पण सत्यजित तांबे अगदी त्यांच्या उलट आहेत.परंतु काँग्रेस ने दिलेले तिकीट नाकारुन डॉ.तांबे यांनी आपला मुलगा सत्यजित यांना का उभे केले याचे कोडे कुणाला उलगडलेले नाही.

मामा बाळासाहेब थोरात आणि भाचे यांच्यात एक साम्य आहे.1985 साली बाळासाहेब थोरात यांना संगमनेर मतदार संघातून काँग्रेसने तिकीट नाकारल्यानंतर ते अपक्ष निवडून आले आणि सत्यजित ही पहिल्यांदा अपक्ष निवडून आले आहेत. त्यासाठी मात्र त्याचे वडील डॉ.सुधीर तांबे यांना फार मोठा त्याग आणि मनस्ताप सहन करावा लागला.या विजयानंतर थेट दिल्लीत जाऊन सत्यजित काँग्रेस मध्ये सन्मानाने परततील,असा त्यांच्या समर्थकांना विश्वास आहे.

# बिबट्या आला रे ?



भूमिका


निलेश दुटाळ
91- 87668 40811

**महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये बिबट्याचे दर्शन होत आहे. वन्य प्राणी पहायला लोकांना प्राणी संग्रहालयात जावे लागत होते. ते प्राणी आता खेड्यापाड्यात घरात घुसन हल्ला करायला लागले आहेत. जिथे-तिथे बिबट्या आला रे? इथे बिबट्या दिसला, तिथे बिबट्या दिसला अशी चर्चा आपणास ऐकायला मिळते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बिबट्याने दहशत माजवली आहे.**

शहरी तसेच ग्रामीण भागात बिबटे दिसायला लागले आहेत. विशेषता ग्रामीण भागात बिबट्याचे अधिक प्रमाणात दर्शन होताना दिसत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, तसेच सामान्य लोक यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा ग्रामीण भाग मागास असल्याने, ग्रामीण भागात वाहतुकीची पुरेशी साधने नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी 15 ते 20 कि.मी. पर्यंत प्रवास करावा लागतो. घरापर्यंत वाहतुकीची साधने नसल्याने घरापासून काही अंतरापर्यंत चालत प्रवास करावा लागतो.

शिक्षणासाठी सकाळी लवकर उठून उजेडाच्या आतच घरातून बाहेर पडावे लागते. दगड धोंड्यातून पायी प्रवास करताना खाली पायाकडे बघावे, की आजूबाजूला कुठे बिबट्या लपला आहे हे बघावे असा प्रश्न विद्यार्थांना पडतो.गावागावात रस्त्यावर आजही विजेचे खांब नाहीत.आणि जिथे खांब आहेत तिथेही खांबा खांबामध्ये बरेच अंतर आहे. त्यामुळे हातात बॅटरी घेऊन अंधारात भित-भीत प्रवास करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन शिक्षणासाठी प्रवास करावा लागत आहे.

शेतकऱ्यालाही शेतात जाताना आज बिबट्याचे दर्शन होईल काय? का कोण्या इतर प्राण्याचे दर्शन होईल याची चिंता करतच शेतात जावे लागत आहे. कृषी पंपाची विज रात्री असेल तर रात्री शेताला पाणी कसे द्यायचे



या स्थितीत शेतकरी जगत आहे. पूर्वी रानडुकरे शेतात दिसायची परंतु आता बिबट्याचा वावर वाढला आहे. शेतीत काम करणारे शेतमजुरही बिबट्याच्या भितीने मजुरीला येत नाहीत. किंवा इतर कोणी तरी बरोबर असल्याशिवाय शेतात मजुरीला येत नाहीत.मजुरालाही जीव मुठीत घेऊन शेतात काम करावे लागत आहे. कारण बऱ्याच ठिकाणी बिबट्याने दिवसाढवळ्या पाळीव प्राण्यांवर तसेच माणसांवर हल्ला केलेला आहे.ऊसतोड करणाऱ्या कामगारांना राहण्याची सोय नसल्याने ऊसतोड कामगारांना शेतात झोपडी उभारुन रहावे लागते. शेतकरी ही शेतात घर बांधून राहू लागलेत. जेणेकरुन शेतात जाणे येणे सोपे होईल.काही ठिकाणी बिबट्याने घरात घुसून हल्ले केलेले आहेत. छोट्या शेतकऱ्याला , कामगाराला ,झोपडीत राहणाऱ्या लोकांना जीव मुठीत घेऊन रात्र काढावी लागत आहे.

शेतकरी अल्पजमीन असल्याकारणाने उपजिविकिचे साधन म्हणून शेळी, म्हैस, गाय, अशा पाळीव प्राण्यांचा सांभाळ करत असतो. आजपर्यंत बिबट्याने शेतकऱ्यांचे पशुधन समजल्या जाणाऱ्या अनेक पाळीव प्राण्यांवर हल्ले करुन अनेक प्राण्यांचे बळी घेतले आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. बिबट्याने केवळ पाळीव प्राण्यांचेच बळी घेतले नाहीत तर अनेक ठिकाणी माणसांवर देखील हल्ले केलेले आहेत. त्यामध्ये अनेक लोकांचा बळी गेलेला आहे. शेतकरी शेतात राहायला गेल्याने बिबट्याला सहज खाद्य मिळत असल्याने बिबट्याने जंगलाऐवजी शेतकऱ्यांच्या ऊसात ठाण मांडली आहे.असे किती बळी जाईपर्यंत सरकार शांत बसणार आहे. यासाठी काही तरी ठोस उपाययोजना केली पाहिजे. असा शेतकऱ्यांचा प्रश्न आहे? महावितरणे दिवसा कृषीपंपांना विज पुरवठा केला पाहिजे तसेच वनविभागामार्फत अधिकाधिक जनजागृती करणे आवश्यक आहे. सरकारने कायमस्वरुपी ठोस उपाययोजना केली पाहिजे. बिबट्यांना जेरबंद करणारी यंत्रणा अद्ययावत केली पाहिजे. वनविभागाने नरबळी जाईपर्यंत न थांबता तात्काळ बिबट्यांना जेरबंद करुन पाळीव प्राणी तसेच मनुष्याचे बळी थांबवले पाहिजेत. बिबट्याच्या हल्ल्यात बळी गेलेल्या कुटूंबाला आर्थिक मदत करण्यापेक्षा नरबळी जाण्याअगोदर बिबट्याला जेरबंद करण्याची उपाययोजना केली पाहिजे.

वन्यप्राणी जगले पाहिजेत हे योग्य असले तरी मनुष्याचे गेलेले बळी हे कितपर्यंत योग्य आहे ? याचा विचार करण्याची गरज आहे. शहरात घुसणारा बिबट्या तात्काळ जेरबंद कण्यासाठी प्रयत्न केले जातात किंवा जेरबंद केला जातो. मात्र ग्रामीण भागातील बिबट्या जेरबंद करायला नरबळी का जावा लागतो.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ...भाजपात आलोय, ही माझी अडचण!

## फडणवीसांच्या उपस्थितीत भरसभेत नारायण राणेंचं वक्तव्य !

। मुंबई। महाईन्यूज ।

**भारतीय जनता पार्टीने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंगणेवाडी येथे जोरदार शक्तीप्रदर्शन केलं आहे. या कार्यक्रमातून भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंचा एकेरी उल्लेख करत टीका केली आहे. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी काय केलं? असा सवालही राणेंनी यावेळी विचारला.**



आंगणेवाडी येथे केलेल्या भाषणात नारायण राणे म्हणाले, "शिवसेना वाढायला... घडायला... आणि सत्तेत यायला... कोकणाने आधार दिला. नारायण राणेंनी आधार दिला, असं मी म्हणत नाही. पण महाराष्ट्रातील सगळ्या जिल्ह्यात वणवण फिरणारा कोकणी माणूसच होता. मग उद्धवा अडीच वर्षात काय केलंस रे बाबा? केवळ दोन वेळा मासे खायला आलास."उद्धव ठाकरेंनी कोकणात कोणताही विकास केला नाही. कोकणात एखादा प्रकल्प आला तर त्याला शिवसेनेकडून विरोध केला जातो. त्यांनी एन्रॉन प्रकल्पालाही विरोध केला. पण जेव्हा एन्रॉन प्रकल्प इथे आला तर सगळ्यात जास्त कामं कुणी घेतली? सगळ्यात जास्त गाड्या कुणाच्या होत्या? कंत्राटदार कोण होते? राजन साळवी हेही एक कंत्राटदार होते, आता ते आमदार आहेत, अशी टीका नारायण राणेंनी केली.उद्धव ठाकरेंना उद्देशून राणे पुढे म्हणाले, "जिल्ह्यात एकही काम करायचं नाही, कुणाला मदत करायची नाही, गरीबांना मदत करायची नाही. कुणाच्या घरात अन्न शिजत नाही, धान्य नाहीये, हे बघायचं नाही. आताच्या शिवसेनेतील नेत्यांनी कधी पाच किलो धान्य तरी दिलं का? येथे कुपोषित बालकं आहेत. त्यातील कुणाची तरी विचारपूस केली का? त्यांचं कुपोषण घालवण्याची जबाबदारी घेतली का? असं काही करायचं नाही केवळ राणेंवर टीका करायची. कधी बालवाडी, शाळा, कॉलेज तरी काढलं का? शिक्षण क्षेत्रात आम्ही काम केलं. केवळ सरकारच्याच पैशावर काम केलं नाही.""मी त्यांच्या प्रश्नाला उत्तर देणार नाही. जे काही द्यायचं ते मी त्याचवेळी देणार... पण हे सगळं आता मी सहन करतोय. कारण मी आता भाजपात आलोय, ही माझी अडचण आहे. भाजपात सगळी सहनशील, शांत आणि विचारसरणी मानणारे लोक आहेत. त्यामुळे मीही सगळं सहन करतोय.

### उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला

उद्धव ठाकरेंना उद्देशून राणे पुढे म्हणाले, "जिल्ह्यात एकही काम करायचं नाही, कुणाला मदत करायची नाही, गरीबांना मदत करायची नाही. कुणाच्या घरात अन्न शिजत नाही, धान्य नाहीये, हे बघायचं नाही. आताच्या शिवसेनेतील नेत्यांनी कधी पाच किलो धान्य तरी दिलं का? येथे कुपोषित बालकं आहेत. त्यातील कुणाची तरी विचारपूस केली का? त्यांचं कुपोषण घालवण्याची जबाबदारी घेतली का? असं काही करायचं नाही केवळ राणेंवर टीका करायची. कधी बालवाडी, शाळा, कॉलेज तरी काढलं का? शिक्षण क्षेत्रात आम्ही काम केलं. केवळ सरकारच्याच पैशावर काम केलं नाही."

# "ही 'स्क्रिप्टेड स्टोरी', बाळासाहेब थोरातांना अडचणीत आणण्यासाठी षडयंत्र रचलं आणि..."

## सत्यजीत तांबेंचे गंभीर आरोप

।नाशिक। महाईन्यूज।

**नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवारीवरून काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली. त्यावरून अनेक आरोप-प्रत्यारोप झाले. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांचे मेहुणे डॉ. सुधीर तांबे यांचं पक्षातून निलंबनही झालं. मात्र, आता सत्यजीत तांबे यांनी निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून विजय मिळवल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहेत.**

"बाळासाहेब थोरात यांना अडचणीत आणण्यासाठी आणि आमच्या कुटुंबाला काँग्रेस बाहेर ढकलण्यासाठी षडयंत्र रचण्यात आले," असा आरोप सत्यजीत तांबेंनी केला. ते शनिवारी (४ फेब्रुवारी) नाशिकमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

सत्यजीत तांबे म्हणाले, "मी एक दोन पत्रकार परिषदेत ऐकलं की नाशिक पदवीधर मतदारसंघातून कुणाला उमेदवारी द्यायची हा निर्णय तांबे कुटुंबाला घ्यायचा होता. मग बरोबर १२.३० वाजता दिल्लीतून माझ्या वडिलांची उमेदवारी का जाहीर झाली? माझे वडील सांगत आहेत की, मला उभं राहायचं नाही, माझ्या मुलाला उभं करायचं आहे, तर मग माझ्या वडिलांची उमेदवारी साडेबारा वाजता का जाहीर करण्यात आली."मग एकच उमेदवारी दिल्लीतून जाहीर का झाली?"

"महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीतील एकाही जागेचा उमेदवार दिल्लीतून जाहीर झाला नाही. अमरावती, नागपूरमधील उमेदवारांचं नाव दिल्लीतून जाहीर झालं का? मग एकच उमेदवारी दिल्लीतून जाहीर का झाली? हे सर्व एका षडयंत्राचा भाग आहे," असा गंभीर आरोप सत्यजीत तांबेंनी केला. "ही 'स्क्रिप्टेड स्टोरी' होती. हे षडयंत्र बाळासाहेब थोरात यांना अडचणीत आणण्यासाठी, सत्यजीत तांबेला उमेदवारी मिळू नये आणि आमच्या कुटुंबाला पक्षाबाहेर ढकलण्यासाठी रचलं गेलं असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही," असंही सत्यजीत तांबेंनी नमूद केलं.



### "मी काँग्रेसचा उमेदवार, हे माझं पहिलं वाक्य होतं"

सत्यजीत तांबे पुढे म्हणाले, "मी माझ्या पहिल्या पत्रकार परिषदेत स्पष्टपणे म्हटलं होतं की, मी काँग्रेसचा उमेदवार आहे. हे माझं पहिलं वाक्य होतं. माझ्या वडिलांनी तर आम्ही महाविकासआघाडीचे आहोत, असाही शब्दही वापरला होता. तसेच अपक्ष असल्याने सर्व पक्षांनी माझ्या पाठिशी उभं राहावं, अशी भूमिका मी घेतली."

### "मला भाजपात ढकलण्याचंच काम झालं"

"मी सगळ्याच पक्षांकडे पाठिंबा मागायला जाणार आहे आणि त्यात भाजपाचंही नाव घेतलं. परंतू, मी भाजपाचा पाठिंबा घेणार अशी बातमी चालवण्यात आली. पक्षांतर्गत ही स्क्रिप्ट आधीच तयार झाली होती. त्याला बळ देण्याचं काम काही लोकांनी केलं. मला भाजपात ढकलण्याचंच काम झालं. हे अर्धसत्य मागील २५ दिवसांपासून सुरू होतं. त्यामुळे हे खरंखरं सांगण्यासाठी मी पुढे आलो," असं सत्यजीत तांबेंनी सांगितलं.

# "महाविकास आघाडी माझ्यावर सूड उगवत आहे"

## चंद्रशेखर बावनकुळेंचा आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।

**भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात हजेरी लावली.**



भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात हजेरी लावली. यावेळी बावनकुळे म्हणाले की, राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना त्यांनी माझ्याविरोधात आणि आमच्या २१ पदाधिकाऱ्यांच्या विरोधात एफआयआर दाखल केला होता. त्यामुळे आज न्यायालयात यावं लागलं.

बावनकुळे म्हणाले की, आज न्यायालयात आलो नसतो तर माझ्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आलं असतं. आम्ही न्यायालयाला विनंती केली आहे की, चुकीच्या पद्धतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाविकास आघाडी जाणीवपूर्वक माझ्यावर सूड उगवत आहे. आम्ही न्यायालयात पुरावे सादर करू, आमचं म्हणणं न्यायालय नक्कीच ऐकेल असा मला विश्वास आहे.

### मविआ माझ्यावर सूड उगवतेय

**बावनकुळे म्हणाले की, आज न्यायालयात आलो नसतो तर माझ्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आलं असतं. आम्ही न्यायालयाला विनंती केली आहे की, चुकीच्या पद्धतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाविकास आघाडी जाणीवपूर्वक माझ्यावर सूड उगवत आहे. आम्ही न्यायालयात पुरावे सादर करू, आमचं म्हणणं न्यायालय नक्कीच ऐकेल असा मला विश्वास आहे. भाजप नेते आणि पदाधिकाऱ्यांना वेगवेगळ्या खटल्यांमध्ये अडकवण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे.**

# भाजपाने त्रिपुरा निवडणुकीचं रणशिंग फुंकलं!

## जेपी नड्डा, स्मृती इराणींसह स्टार प्रचारकांच्या 36 सभा होणार



।भोपाळ । महाईन्यूज ।

**भारतीय जनता पार्टीने शुक्वारपासून (३ फेब्रुवारी) त्रिपुरामध्ये निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी प्रचाराला सुरुवात केली. निवडणुकीपर्यंत नड्डा यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या स्टार प्रचारकांच्या राज्यभरात ३५ प्रचारसभा होणार आहेत. यावेळी नड्डा यांनी विकास आणि राज्यातील हिंसाचाराचा अंत अशा दोन मुख्य मुद्द्यांना हात घातला.**

नड्डा यांची पहिली सभा गोमती जिल्ह्यातील अमरपूर येथे झाली. येथे आयोजित 'विजय संकल्प यात्रे'दरम्यान त्यांनी काँग्रेस-आघाडीवर जोरदार टीका केली. नड्डा म्हणाले की, "डावे आणि काँग्रेस सरकारच्या काळात राज्यात बंडखोरी, राजकीय हत्या, हिंसाचार वाढला. तसेच लूटमार होत होती

भारतीय जनता पार्टीच्या स्टार प्रचारक स्मृती इराणी देखील त्रिपुरात दाखल झाल्या आहेत. तसेच केंद्रीय राज्यमंत्री प्रतिमा भौमिक देखील राज्यभर भाजपाचा प्रचार करणार आहेत. भौमिक या त्रिपुरात निवडणूक देखील लढवत आहेत. यासह आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, पश्चिम बंगालचे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी या प्रचारसभेत सहभागी झाले होते. पश्चिम बंगालमधील भाजप नेते दिलीप घोष यांनी भाजपच्या त्रिपुरातील विजय संकल्प यात्रेला हजेरी लावली.

### विरोधकांची अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड : नड्डा

**».नड्डा यांनी यावेळी विरोधकांवर जोरदा हल्ला चढवला. ते म्हणाले की, "जे लोक आमच्या विरोधात लढत आहेत, ते कोण आहेत? त्यांनी ही युती (डावे आणि काँग्रेस) कशासाठी केलीय माहितीय का? हा केवळ त्यांचा स्वतःचं अस्तित्व वाचवण्यासाठीचा अट्टाहास आहे. त्रिपुराला देशात आणि जगात पुढे नेण्यासाठी आम्ही लढत आहोत. आमची ही लढाई तरुणांना नवे पंख देण्यासाठी, महिलांच्या सन्मानासाठी, विकास आणि व्यापाराला चालना देण्यासाठी सुरू आहे."**

---

# "भीक नका मागू, एका हातात कुराण अन् दुसऱ्या हातात अणुबॉम्ब घ्या!

## पाक सरकारला कट्टरपंथीयांचा सल्ला



।तिरुअनंतपुरम। महाईन्यूज ।

मागील काही काळापासून पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेली आहे. येथील जनता एक वेळच्या जेवणासाठी मोताद झाली आहे. पाकिस्तानमधील सामन्य नागरिकांचा दररोज जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. देशातील अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी पाकिस्तान सरकारना परदेशांसमोर हात पसरावे लागत आहेत. याच पार्श्वभूमीवर पाकिस्तानमधील कट्टरपंथीय संघटनेच्या नेत्याने पाकिस्तान सरकारला अजब सल्ला दिला आहे.

पाकिस्तानने जगातील विविध देशांसमोर भीकेसाठी हात पसरण्याऐवजी एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात अणुबॉम्ब घेऊन जगाला धमकावलं पाहिजे. असं केल्याने संपूर्ण जग पाकिस्तानच्या मागण्या मान्य करेल, असा सल्ला पाकिस्तानमधील कट्टरपंथी गट तेहरीक-ए-लबाइकचे नेते अमीर हाफिज साद हुसेन रिझवी याने पाकिस्तान सरकारला दिला आहे. रिझवी याने जाहीर भाषणातून हा सल्ला दिला असून या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियात वेगानं व्हायरल होत आहे.संबंधित व्हिडीओत रिझवी म्हणाले, "अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी लष्कर प्रमुखांना समोर करून पाकिस्तान सरकार जगभरात सगळीकडे भीक मागत आहे. कुणी भीक घालतंय, तर कुणी भीक देत नाहीये. काही देश स्वत:चा फायदा बघत आहेत. पण तुम्ही जगाकडे भीक मागण्यासाठी का जात आहात? पाकिस्तान सरकार आणि लष्कराने उजव्या हातात कुराण आणि डाव्या हातात अणुबॉम्बचा बॉक्स घेऊन जगाला धमकावलं पाहिजे. त्यानंतर संपूर्ण जग तुमच्या पायाशी लोटांगण घालेल आणि तुमच्या सर्व मागण्या मान्य होतील."

### काही देश स्वत:चा फायदा बघत आहेत

**»पाकिस्तानने जगातील विविध देशांसमोर भीकेसाठी हात पसरण्याऐवजी एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात अणुबॉम्ब घेऊन जगाला धमकावलं पाहिजे. असं केल्याने संपूर्ण जग पाकिस्तानच्या मागण्या मान्य करेल, असा सल्ला पाकिस्तानमधील कट्टरपंथी गट तेहरीक-ए-लबाइकचे नेते अमीर हाफिज साद हुसेन रिझवी याने पाकिस्तान सरकारला दिला आहे. रिझवी याने जाहीर भाषणातून हा सल्ला दिला असून या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियात वेगानं व्हायरल होत आहे.संबंधित व्हिडीओत रिझवी म्हणाले, "अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी लष्कर प्रमुखांना समोर करून पाकिस्तान सरकार जगभरात सगळीकडे भीक मागत आहे. कुणी भीक घालतंय, तर कुणी भीक देत नाहीये. काही देश स्वत:चा फायदा बघत आहेत.**

# सर्वोच्च न्यायालयाला मिळणार पाच नवे न्यायाधीश

## कॉलेजियमच्या नावांवर केंद्राचे शिक्कामोर्तब

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

कॉलेजियमने सर्वोच्च न्यायालयात बढती दिलेल्या पाच न्यायाधीशांच्या नियुक्तीवर केंद्र सरकारनेही शनिवारी शिक्कामोर्तब केले. हे पाच न्यायाधीश सध्या देशातील विविध न्यायालयात सध्या कार्यरत आहेत. न्यायाधीश निवडीच्या कॉलेजियम पद्धतीवर आक्षेप घेणारे केंद्रीय कायदा मंत्री किरन रिजिजू यांनी सर्वोच्च न्यायालयातील नवनियुक्त पाच न्यायाधीशांना ट्विट करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. सध्या सर्वोच्च न्यायालयासाठी मंजूर न्यायाधीशांची पदे ३४ आहेत. २७ न्यायाधीश सध्या कार्यरत आहेत. पाच न्यायाधीशांची नियुक्ती आता होईल. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३२ होईल. कॉलेजियमने ३१ जानेवारी २०२३ रोजी अजून दोन न्यायाधीशांची नावे सर्वोच्च न्यायालयात बढतीसाठी केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठवली आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश राजेश बिंदल व गुजरात उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरविंद कुमार यांच्या नावावर केंद्र सरकारने शिक्कामोर्तब केल्यास त्यांनाही सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती मिळेल. डिसेंबर २०२२ मध्ये कॉलेजियमने उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात बढती मिळालेल्या पाच न्यायाधीशांची निवड केली. या पाच न्यायाधीशांची नावे मंजूरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात आली. केंद्र सरकारने या नावांवर काय निर्णय घेतला अशी विचारणा न्यायालयाने केली होती. सर्वोच्च न्यायालयात बढती मिळालेल्या न्यायाधीशांचे नियुक्तीपत्र रविवारपर्यंत जारी केले जाईल, अशी हमी आर. व्हेंकटरमाणी यांनी न्यायालयात दिली होती. न्या. एस. के. कौल व न्या. अभय ओक यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. बंगळूरूच्या वकील संघटनेने केंद्र सरकारच्या विरोधात याचिका केली आहे. न्यायाधीश निवडीसाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नियमांचे पालन केले जात नाही. त्यामुळे केंद्र सरकारवर न्यायालयाच्या अवमानतेची कारवाई करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.



# 'वऱ्हाड निघालंय राजस्थानला...', कियारा तिच्या कुटुंबासोबत जैसलमेरला रवाना



किआरा अडवाणी आणि सिद्धार्थ लग्नबंधनात केली आहे. फेब्रुवारीला लग्नबंधनात लग्नाची

मल्होत्रा ६ फेब्रुवारीला जैसलमेरच्या सूर्यगड पॅलेसमध्ये अडकणार आहेत. दोघांच्या कुटुंबीयांनी लग्नाची पूर्ण तयारी पण लेटेस्ट रिपोर्टमध्ये असे सांगण्यात आले आहे की, 7 सिड आणि कियारा राजस्थानच्या जैसलमेरमध्ये अडकणार आहेत. कियारा अडवाणीच्या तयारी जोरात सुरू असून आज ही अभिनेत्री लग्नासाठी जैसलमेरला रवाना झाली आहे. कियारा तिच्या कुटुंबासोबत कलिना विमानतळावर दिसली. यादरम्यान, अभिनेत्री पांढऱ्या रंगाच्या जंपसूटमध्ये दिसली होती ज्यामध्ये तिने गुलाबी शाल देखील



# मणिपूरमध्ये फॅशन शो

मणिपूर मधील इम्फाल येथे एका फॅशन शो व्हेन्यू जवळ मोठा धमाका झाल्याचं समोर आलं आहे. या फॅशन शो मध्ये सनी लियोनी भाग घेणार होती. फॅशन शो संबंधित एका अधिकाऱ्यानं याविषयी माहिती दिली आहे.या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचं कळत आहे. हा धमाका मणिपूरच्या हट्टा कांगजीबंग परिसरात झाला आहे. व्हेन्यू या दूर्घटनाग्रस्त ठिकाणाहून जवळपास १०० मीटर अंतरावर होता. शनिवारी ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता हा धमाका झाला आहे.वेगवेगळ्या धर्मातून आहेत कियाराचे आई-वडील,चला जाणून घेऊया अभिनेत्रीच्या पालकांचं मूळ घराणं..

अधिकाऱ्यानं सांगितलं आहे की, हा स्फोट एक्सप्लोसिव्ह डिव्हाइसमुळे की ग्रेनाइडमुळे झाला आहे हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेनं हा स्फोट घडवून आणण्याची जबाबदारी स्विकारलेली नाही.स्फोट जिथे झाला आहे तिथून काहीच अंतरावर फॅशन शोसाठी स्टेज बांधण्यात आला होता. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्र हाती घेतली आहेत. पोलिसांच्या एका टीमनं तेथील आसपासच्या ठीकाणांचे सर्च ऑपरेशन सुरू केले आहे. अद्याप यासाठी कोणालाही ताब्यात घेण्यात आलेलं नाही.सनी लियोनी रविवारी म्हणजे उद्या ५ फेब्रुवारी रोजी या फॅशन शो मध्ये शो स्टॉपर म्हणून भाग घेणार होती. ती मणिपूरमध्ये जाऊन खादी आणि हँडलूम सारख्या प्रॉडक्ट्सना प्रमोट करणार होती.

या शो ची टॅगलाइनच होती.. सनी लियोनी भाग घेणार म्हणून या शोची खूप चर्चा होती आणि शो ची तिकीट विक्री देखील मोठ्या प्रमाणात झाली होती.



# श्रद्धा कपूरने दिली प्रेमाची कबुली

बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर जवळजवळ २ वर्षांपासून चित्रपटापासून लांब आहे. २०२० मध्ये 'बाघी ३'मध्ये श्रद्धा मुख्य भूमिकेत दिसली होती. त्यानंतर आता २ वर्षांनी श्रद्धा कपूरचा 'तू झुठी मै मक्कार' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात श्रद्धाबरोबर रणबीर कपूर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. प्रथमच श्रद्धा आणि रणबीर ही जोडी प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.

लव रंजन दिग्दर्शित या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस पडला आहे. तरुण पिढीचे प्रेमाबद्दलचे विचार आणि प्रेमाकडे बघायचा दृष्टिकोन यावर चित्रपटात प्रकाश टाकण्यात आला आहे. रोमँटिक कॉमेडी असलेल्या या चित्रपटाचं 'तेरे प्यार में' हे फ्रेश गाणंसुद्धा नुकतंच प्रदर्शित झालं आहे. अरिजित सिंगच्या आवाजातील हे गाणं लोकांना चांगलंच आवडलं आहे, शिवाय यात श्रद्धा आणि रणबीरमधील केमिस्ट्रीसुद्धा प्रेक्षकांना आवडली आहे.सध्या रणबीर आणि श्रद्धा दोघेही या चित्रपटाचं प्रमोशन करण्यात व्यस्त आहेत. या गाण्याचं प्रमोशन करतानाच श्रद्धाने तिच्या प्रेमाबद्दल खुलासा केला आहे. एक व्हिडिओ शेअर करत श्रद्धाने तिच्या प्रेमाची कबुली दिली आहे. इतकंच नाही तर या व्हिडिओ शेअर करत तिने तिच्या चाहत्यांनासुद्धा त्यांच्या प्रेमाची कबुली देत या नव्या गाण्यावर रील शेअर करायची विनंती केली आहे.

या व्हिडिओमध्ये श्रद्धा स्वतःसाठी पाणी पुरी बनवत आहे, आणि ती पाणी पुरी खाताना श्रद्धा खूप आनंदी आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून श्रद्धा पाणीपुरीच्या प्रेमात आकंठ बुडाली असल्याचं स्पष्ट झालं आहे.



# कार्तिक आर्यन सारा अली खानबरोबर पुन्हा करणार 'आशिकी'

'आशिकी' या १९९० साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटातील प्रेमकथा प्रेक्षकांना फारच भावली होती. २०१३ साली या चित्रपटाचा सिक्वेल म्हणजेच 'आशिकी २' प्रदर्शित करण्यात आला. आता याच चित्रपटाच्या तिसरा भाग लवकरच प्रदर्शित होणार आहे. आशिकी ३ ' चित्रपटात बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन प्रमुख भूमिका साकारताना दिसणार आहे. कार्तिकबरोबर यामध्ये आता त्याच्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर दिसणार आहे.

कार्तिकसह 'आशिकी ३' चित्रपटात नायिकेची भूमिका कोण साकारणार याबाबत



गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरु होती. बॉलिवूडमधील आघाडीच्या अभिनेत्रींची नावेही पुढे आली होती. दीपिका पदुकोण, क्रिती सेनॉन किंवा श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा होती यात दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदना दिसणार होती मात्र आता सारा अली खान झळकणार अशी चर्चा आहे.कार्तिक सारा याआधी लव्ह आजकल २ चित्रपटात एकत्र दिसले होते. हा चित्रपट फारसा चालला नाही. या चित्रपटानंतर दोघांच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्या. आशिकी ३ निर्मात्यांना हा चित्रपट रोमँटिक बनवायचा आहे म्हणून निर्मात्यांना अशीच एक जोडी अपेक्षित आहे. या चित्रपटात अभिनेते पंकज त्रिपाठी दिसणार अशी ही चर्चा सुरु आहे. टी- सीरिजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि निर्माते भूषण कुमार यांनी 'आशिकी ३'ची घोषणा केली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग बासू करणार आहेत. अभिनेता कार्तिक आर्यन सध्या चर्चेत आहे. मागच्या वर्षी त्याचा 'भूलभुलैय्या २' हा चित्रपट खूप चालला.

# 4 मार्चपासून रंगणार महिला आयपीएलचा थरार

## पहिल्या सामन्यात 'हे' दोन संघ असणार आमनेसामने

| अहमदाबाद |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**महिला आयपीएलचा पहिला हंगाम ४ मार्चपासून सुरू होत आहे. पहिल्या हंगामातील पहिल्या सामन्यात मुकेश अंबानींचा मुंबई आणि गौतम अंबानींचा अहमदाबाद संघ आमनेसामने असतील. महिला आयपीएलचे सर्व सामने मुंबईत खेळवले जाणार असले, तरी ते वानखेडेवर होणार नाहीत.**



बीसीसीआय महिला प्रीमियर लीगची धमाकेदार सुरुवात करण्याचा विचार करत आहे. क्रिकबझच्या वृत्तानुसार, प्रसारित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, पहिला सामना मुंबई आणि अहमदाबाद संघांमध्ये शनिवार ४ मार्च रोजी होणार आहे. देशातील दोन मोठ्या उद्योगपतींच्या संघात हा सामना होणार आहे. एकीकडे मुंबई संघाचे मालक मुकेश अंबानी आहे, तर दुसरीकडे अहमदाबाद संघाचे मालक गौतम अदानी आहेत.रिपोर्टनुसार, संपूर्ण महिला प्रीमियर लीगचे आयोजन मुंबईतील दोन मैदानांवर केले जाईल. पाच संघांची ही स्पर्धा ब्रेबॉर्न स्टेडियम आणि डीवाय पाटील स्टेडियमवर होणार आहे. तसेच हे सामने डबल हेडरमध्य खेळवले जातील. परंतु या स्पर्धेचा कोणताही सामना मुंबईतील सर्वात मोठे स्टेडियम वानखेडेवर होणार नाही. खरं तर, पुरुषांची आयपीएल आणि भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया एकदिवसीय मालिका पाहता महिला प्रीमियर लीगचे सामने वानखेडेवर खेळवला जाणार नाहीत.

वेळापत्रकानुसार, गट टप्प्यातील सामन्यांनंतर जो संघ गुणतालिकेत अव्वल असेल तो थेट अंतिम फेरीत प्रवेश करेल. दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावरील संघामध्ये एकमेव एलिमिनेटर असेल तर गुणतालिकेतील तळाचे २ संघ बाहेर पडतील. एलिमिनेटर सामन्यातील विजेता दुसरा अंतिम फेरीत पोहोचणारा संघ असेल. या स्पर्धेत एकूण २२ सामने खेळवले जाणार आहेत.

पर्धेच्या मधोमध ५ दिवस असे असतील, जेव्हा कोणतेही सामने होणार नाहीत. १७ ते १८ मार्च रोजी कोणतेही सामने होणार नाहीत. ग्रुप स्टेजचे सर्व सामने खेळल्यानंतर २ दिवसांचा ब्रेक असेल. एलिमेंटरचा सामना २४ मार्च रोजी होणार आहे. यानंतर २५ तारखेला ब्रेक असेल. त्यानंतर २६ तारखेला स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला जाईल.

### महिला प्रीमियर लीग 2023चे संघ

**१- अहमदाबाद महिला आयपीएल संघ**
**मालक: अदानी स्पोर्ट्सलाइन प्रायव्हेट लिमिटेड**
**किंमत: १२८९ कोटी**
**२- मुंबई महिला आयपीएल संघ**
**मालक: इंडियाविन स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**
**किंमत: ९१२.९९कोटी**
**३- रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला आयपीएल संघ**
**मालक: रॉयल चॅलेंजर्स स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**
**किंमत: ९०१ कोटी**
**४- दिल्ली महिला आयपीएल संघ**
**मालक: जेएसडब्लयू जीएमआर क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेड**
**किंमत: ८१० कोटी**
**५- लखनऊ महिला आयपीएल संघ**
**मालक: कॅप्री ग्लोबल होल्डिंग्स प्रायव्हेट लिमिटेड**
**किंमत: ७५७ कोटी**

# 'रोहित शर्मा नव्हे, तर विराट कोहली खेळणार पुढचा टी-२० विश्वचषक'

## माजी खेळाडूची भविष्यवाणी

|ऑस्ट्रेलिया|
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

टीम इंडियाने २०२४ मध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी आतापासून संघबांधणी सुरु केली आहे. या टी-२० विश्वचषकात भारतीय संघाचे नेतृत्व हार्दिक पांड्या करणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. अशात माजी क्रिकेटपटू वसीम जाफरने या टी-२० विश्वचषकातील विराट आणि रोहितच्या सहभागाबाबत मोठी भविष्यवाणी केली आहे.

वसीम जाफरने कर्णधार रोहित शर्मा पुढील टी-२० विश्वचषक स्पर्धेत खेळणार नसल्याची मोठी भविष्यवाणी केली आहे. त्याचबरोबर विराट कोहली या आयसीसी स्पर्धेत शेवटच्या वेळी खेळताना दिसणार आहे, असे म्हटले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताला गेल्या वर्षी टी-२० विश्वचषक २०२२च्या उपांत्य फेरीपर्यंत मजल मारता आली होती. कोहलीने या स्पर्धेत चमकदार कामगिरी केली होती. पण भारताल इंग्लंडकडून १० गडी राखून पराभव पत्करावा लागल्याने, भारताचे विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न अधुरे राहिले. वसीम जाफरने पाकिस्तानी माजी क्रिकेटर बासित अलीच्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, "मोठ्या स्पर्धा पाहता विराट कोहली आणि रोहित शर्माला विश्रांती देण्यात आली होती. ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी सामने येत आहेत, त्यानंतर आयपीएल आहे. त्यानंतर एकदिवसीय विश्वचषक. भारत वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकतो. भविष्याकडे पाहता हा खेळ (टी-२०) तरुणांसाठी आहे. व्यक्तिशः मला रोहित शर्मा पुढील टी-२० विश्वचषकात खेळताना दिसत नाही. विराट कोहली खेळू शकतो, पण रोहित शर्मा पुढचा हंगाम नक्कीच



खेळणार नाही. तो आधीच ३६ (३५) वर्षांचा आहे."

आगामी विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर रोहित शर्मा आणि कोहलीला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपासून दूर ठेवणे निवडकर्त्यांचे प्राधान्य असेल, असेही वसीम जाफरने सांगितले. त्यामुळे मोठी स्पर्धा पाहता ते मानसिकदृष्ट्या ताजेतवाने आणि ऑस्ट्रेलिया मालिकेसाठी तयार असणे महत्त्वाचे आहे, असे जाफर म्हणाला.

भारतीय संघातील युवा प्रतिभांना मार्गदर्शन करण्यासाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची गरज आहे का, असे विचारले असता, वसीम जाफर म्हणाला, त्याची गरज नाही. वसीम जाफर पुढे म्हणाला, "मला वाटत नाही की त्यांना मार्गदर्शक शक्तीची गरज आहे. त्यांनी आयपीएलमध्ये इतके क्रिकेट खेळले आहे.

# स्टार जिम्नॅस्ट दीपा कर्माकरला मोठा धक्का

## डोपिंगच्या आरोपावरून21 महिन्यांची बंदी

| वेस्ट इंडीज | महाईन्यूज | वृत्तसंस्था |

भारतीय जिम्नॅस्ट दीपा कर्माकर प्रतिबंधित पदार्थ सेवन केल्याने चर्चेत आली आहे. आयटीए (इंटरनॅशनल टेस्टिंग एजन्सी) दीपाने हायजेनामाइनचे सेवन केल्याचे आढळून आले आहे. चाचणी पॉझिटिव्ह आढळल्यानंतर दीपा कर्माकरला २१ महिन्यांसाठी अपात्रतेसह बंदी घालण्यात आली आहे.

आयटीएने माहिती दिली की, दीपा कर्माकरला २१ महिन्यांच्या कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहे, जे १० जुलै २०२३ पर्यंत लागू आहे. आयटीएने सांगितले की एफआयजी अँटी-डोपिंग नियमांच्या कलम १०.८.८ नुसार केस सेटलमेंट कराराद्वारे त्याचे निराकरण केले गेले आहे.युनायटेड स्टेट्स अँटी-डोपिंग एजन्सी (यूएसएडीए) नुसार, हायजेनामाइनमध्ये मिश्रित अॅड्रेनर्जिक रिसेप्टर क्रियाकलाप आहे. याचा अर्थ असा आहे की ते सामान्य उत्तेजक



म्हणून कार्य करू शकते. २०१७ मध्ये वाडाच्या प्रतिबंधित पदार्थांच्या यादीत त्याचा समावेश करण्यात आला. हायजेनामाइन दमाविरोधी म्हणून काम करू शकते. हे कार्डिओटोनिक देखील असू शकते, याचा अर्थ हृदयाचे आउटपुट वाढवण्यासाठी ते हृदय गती मजबूत करते.

### कोण आहेत दीपा कर्माकर?

त्रिपुराची दीपा कर्माकर ही भारतातील टॉप जिम्नॅस्टपैकी एक आहे. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये ती चौथ्या स्थानावर राहिली होती. यानंतर, २०१८ मध्ये, तिने तुर्कीमधील मर्सिन येथे झालेल्या एफआयजी आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स वर्ल्ड चॅलेंज कपच्या व्हॉल्ट स्पर्धेत देशासाठी सुवर्णपदक जिंकले. अशी कामगिरी करणारी ती भारतातील पहिली जिम्नॅस्ट ठरली.